सकाळ

पुणे, शुक्रवार, ८ सप्टेंबर २०२३

NIE NEWSPAPER IN EDUCATION




चित्र : कपिल घोलप

**दहीहंडी हा बालगोपाळांचा आवडता सण** श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. हा सण श्रीकृष्णाच्या जन्माचे प्रतीक म्हणून साजरा करण्यात येतो. श्रीकृष्णाला बालपणी दही, दूध, लोणी या पदार्थांची आवड होती. कृष्णापासून दह्याचे रक्षण व्हावे, यासाठी यशोदा दह्याची हंडी उंच ठिकाणी ठेवत असे, तरीही श्रीकृष्ण तेथपर्यंत पोहोचण्यात यशस्वी होत असे. यासाठी त्याचे, मित्र त्याला मदत करत असत. या घटनेची आठवण म्हणून सर्वत्र दहीहंडीचा उत्सव साजरा केला जातो. मित्रांनो, तुम्ही तुमच्या सवंगड्यांबरोबर हा सण उत्साहात साजरा केला असेलच, होय ना...



## संस्कारक्षम पिढी घडवण्याचे कार्य

**मी एक शिक्षक आहे. शिक्षण हा माझा स्वधर्म, शाळा हे माझे मंदिर, धडपड ही माझी पूजा अन् 'दुरितांचे तिमिर जावो' ही माझी प्रार्थना.** शिक्षक हा अक्षर सृष्टीचा शेतकरी आहे. तो जपून शब्दांची पेरणी करतो अन् संस्कारक्षम पिढी घडवितो. उच्च शिक्षणाची पदवी घेऊन शिक्षण क्षेत्रात काम करणारी मंडळी आहेत. यांना काही चाकोरीबद्ध नियमांच्या मर्यादा असतात. यातून काही मंडळी विशेष वेळ काढून विद्यार्थ्यांना घडविण्याचे प्रयत्न करीत असतात.

**मातृदेवो भव। पितृदेवो भव।**
**आचार्यदेवो भव। अतिथिदेवो भव।**

असे सांगणारी आपली भारतीय संस्कृती आहे. आज शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले आहेत. संस्कारक्षम पिढी घडवण्याचे कार्य शिक्षकाच्या हाती आहे. म्हणूनच तर शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे. शिक्षकांनी प्रामाणिकपणे केलेले काम ही राष्ट्राची सर्वांत मोठी समाजसेवा आहे. राष्ट्राला लागणारे उत्तम मनुष्यबळ हे शिक्षक निर्माण करत असतात.

शिक्षणामुळे समाजातील सर्व भेदभाव नष्ट होऊन समाज खऱ्या अर्थाने 'आदर्श' बनू शकतो. शिक्षणाची शिदोरी घेऊन माणूस अनेक संकटांना हसत हसत सामोरा जातो. म्हणूनच 'शिक्षण घडवी संस्कार' असे म्हटले जाते. संस्कृती आणि सभ्यता यांतील सुवर्णमध्य बनून समाज घडवण्याचे कार्य फक्त शिक्षणामुळेच घडू शकते. शिक्षक आणि शिक्षण या नाण्याच्या दोन अविभाज्य बाजू मानल्या जातात. या दृष्टीनेच शिक्षकाला राष्ट्रनिर्माण कर्ता म्हणतात. शिक्षकांना विविध कल्पक गोष्टी घडवण्यासाठी सदैव तत्पर असणे गरजेचे आहे. शिक्षकांनी वाचन, मनन, चिंतन, लेखन, निरीक्षण व नियोजन या गोष्टींना पुरेसा वेळ दिला पाहिजे. तरच, दर्जेदार शिक्षण व गुणवंत विद्यार्थी निर्माण होण्यास अधिक काळ लागणार नाही. कारण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात जो ज्ञान-विज्ञानाची सांगड सुयोग्य पद्धतीने घालून विद्यार्थ्यांना नीट समजावून सांगतो तोच सर्वोत्तम शिक्षक.

विद्यार्थ्यांप्रति असलेले प्रेम हे शिक्षकाचे सर्वांत मोठे सौंदर्य असते. कारण, सर्वच स्तरांतून येणारा विद्यार्थी हा शिक्षकांकडून आपुलकी, प्रेम व जिव्हाळा घेण्यासाठी आलेला असतो, म्हणूनच की काय साने गुरुजींनी 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' म्हटले असेल.

**— प्रा. विजय गोसावी,** प्रताप विद्यामंदिर, चोपडा, जि. जळगाव

# नाते शिक्षक - विद्यार्थ्यांचे



**भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसानिमित्त शिक्षकांप्रति सन्मान व्यक्त करण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो.** याच शिक्षणविश्वाने निर्माण केलेले नाते म्हणजे शिक्षक-विद्यार्थी नाते. आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत जपावे असे हे अनोखे नाते.

या अफाट विश्वाची प्रत्येक व्यक्तीला पहिली ओळख होते ती केवळ आणि केवळ शिक्षकांच्या सोबतीने. आपले बोट गुरुजनांच्या हाती सोपवून, तो या विश्वाची सफर करू लागतो. वेगवेगळ्या गोष्टींचा उलगडा होत तो विश्वाशी आणखी एकरूप होतो. ज्या शिक्षकांच्या मदतीने तो हे विश्वरूप पाहत असतो, त्या शिक्षकांवर त्याची प्रचंड निष्ठा असते. विद्यार्थिदशेत असताना व्यक्ती कोणावरही नाही तितका विश्वास आपल्या शिक्षकांवर ठेवतो. शालेय वयात विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर फक्त आणि फक्त शिक्षकच असतात.

शिक्षण क्षेत्राला आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या शिक्षकांचे सर्वस्व त्याचे विद्यार्थीच असतात. कारण, त्या विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यासच शिक्षकांनी घेतलेला असतो. देशासाठी आदर्श नागरिक घडवण्याचा वसा शिक्षकांनी घेतलेला असतो. तसे पाहिले तर विद्यार्थी प्रत्येक शिक्षकासाठी आपल्या कुटुंबातीलच घटक असतात. बाहेरच्या विश्वात विद्यार्थ्यांनी यशाची उंच उंच शिखरे गाठल्यानंतर खरा आनंद होतो तो त्याच्या शिक्षकांना. विद्यार्थ्यांचे यश शिक्षकांना कोणत्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ वाटू लागते. विद्यार्थ्यांचे प्रेम आणि आत्मीय वृत्ती हीच शिक्षकांची सर्वांत मोठी मिळकत आहे.

कितीही अत्याधुनिक शैक्षणिक साधनांचा शोध लागला, नव्या तंत्रज्ञान आले. तरी, शिक्षक-विद्यार्थी हे नाते अढळ होते, अढळ आहे आणि राहणार. शिक्षक-विद्यार्थी हे दोन घटक जणू एकाच शरीराचे अविभाज्य भाग आहेत. अनादी कालापासून असलेले गुरुशिष्यांचे नाते, आधुनिक काळात शिक्षक-विद्यार्थी नात्यामध्ये परावर्तित झाले आहे. हे शिक्षक-विद्यार्थी नाते विश्वाच्या अंतापर्यंत प्राणपणाने जपले जाईल, यात तिळमात्रही शंका नाही.

**— प्रशांत कुलकर्णी,**
उपशिक्षक - महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर, नगर






## कौशल्य ओळखणारे शिक्षक हवेसे

**विद्यार्थ्यांचे मन, मेंदू आणि मनगट यांचा विकास करणारी नवीन शिक्षणपद्धती आता अवलंबिण्यात येणार आहे.** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचार करताना शिक्षकांचे विद्यार्थ्यांशी असलेले नाते महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षकांचा थेट संबंध येतो तो प्रचंड बोलके डोळे, बोलका चेहरा असलेल्या सजीवांशी. त्यामुळे शिक्षण प्रभावी होण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते घट्ट असणे आवश्यक आहे. हे नाते प्रदीर्घ काळापासून महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा विचार करताना लक्षात येते, की ज्याप्रमाणे हाताची पाचही बोटे समान नसली, तरीही त्यांचे महत्त्व काही कमी होत नाही. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे गुण असतात. त्यामुळे एकच गुणवत्तेची मोजपट्टी सर्वांना लावणे योग्य नाही. तसेच, अंगभूत कौशल्यांच्या विकासावर भर देणारे शिक्षक असल्यास निश्चितच विद्यार्थ्यांचा विकास होईल. असे कौशल्य ओळखणारे शिक्षक विद्यार्थ्यांना कायम हवेहवेसे वाटतात. अशा शिक्षकांची प्रतिमा त्यांच्या मनावर कायमची कोरली जाते.

प्राथमिक स्तरावर शिक्षक विद्यार्थ्यांचे आई, वडील, मोठा भाऊ/बहीण, मार्गदर्शक अशा अनेक नात्यांनी जोडलेला असतो. तर माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर एक शिक्षक हा ज्ञानाच्या उंचीने आणि आपल्या देहबोलीने विद्यार्थ्यांसाठी आदर्श व्यक्ती ठरत असतो. आजच्या नव्या तंत्रज्ञानाच्या युगात, बदलत्या काळानुसार शिक्षक समृद्ध असणे ही काळाची गरज आहे. त्यातूनच उत्तम नागरिक, आदर्श, गुणसंपन्न भावी पिढी तयार होईल. यासाठी नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षक समृद्धीसाठी विविध प्रशिक्षणांचा अंतर्भाव केलेला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची मानसिक, भावनिक, आर्थिक गरज ओळखून शिक्षक त्याला साह्य करू शकेल अन् विद्यार्थ्यांचे शिकणे सुलभ होईल. शिवाय, शिक्षक विद्यार्थ्यांमधील नातेही अधिक दृढ होईल.

**— विजया भालदंड,**
एस. के. सोमय्या प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर, (जि. नगर)






**शुभांगी लक्ष्मण कवडे,**
७ वी, न्यू इंग्लिश स्कूल,
वडगाव मावळ, पुणे





**विघ्नेश कैलास येवले,**
७ वी , न्यू इंग्लिश स्कूल,
वडगाव मावळ, पुणे





**वशिष्ठ गुजर,**
६ वी, महाराजा सयाजीराव
हायस्कूल, सातारा

**"Success is not the key to happiness. Happiness is the key to success. If you love what you are doing, you will be successful. —Albert Schweitzer**

# संस्कार

## सुभाषित

**दीपो नाशयते ध्वान्तं धनारोग्यं प्रयच्छति ।**
**कल्याणाय भवति एव दीपज्योतिर्नमोऽस्तु ते ।।**

दिवा अंधाराचा म्हणजेच अज्ञानाचा नाश करतो; ज्ञान, धन व आरोग्य देतो व कल्याण करतो. हे दिव्या, तुला माझा नमस्कार असो.

## गीता श्लोक

**न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषत:।**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते**

देहधारी मनुष्याला कर्मांचा पूर्णपणे त्याग करणे शक्य नसते. मात्र, जो कर्मफलांचा त्याग करतो त्यालाच त्यागी म्हटले जाते.

## सुविचार

जग बदलायचे असेल, तर आधी स्वतःमध्ये बदल करा.
— महात्मा गांधी

## दिनविशेष



**५ सप्टेंबर**

**२००८ :** पंकज अडवानीने जागतिक बिलियर्ड्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.



**६ सप्टेंबर**

**२०१८ :** आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलेल्या सौरभ चौधरीने स्वत:चाच जागतिक विक्रम मोडीत काढत जागतिक नेमबाजीच्या कुमार विभागात सुवर्णपदक जिंकले.



**७ सप्टेंबर**


**२०१२ :** सुनीता विल्यम्सने विक्रमी सहाव्यांदा 'स्पेस वॉक' केले. अवकाश स्थानकाच्या दुरुस्तीसाठी तिने हे यशस्वी 'स्पेस वॉक' केले.

## बोधकथा

प्रशांत सरुडकर

# शिक्षकाचा सन्मान...!

**भारताचे माजी राष्ट्रपती असणारे शंकरदयाळ शर्मा हे उच्चविद्याविभूषित व्यक्तिमत्त्व होते.** राजकीय जीवनातही एक सुसंस्कृत नेता अशी त्यांची ओळख होती. केंब्रिज विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेट मिळविली.



भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांचे योगदान होते. भोपाळ प्रांताचे मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्रिपदे त्यांनी भूषविली. उपराष्ट्रपती, राष्ट्रपती म्हणून त्यांनी काम केले. अनेक कविता लिहिल्या. उर्दू भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. हिंदू आणि इस्लाम या दोन्हीही धर्मांचा त्यांचा अभ्यास होता.

**ते १९९४मध्ये राष्ट्रपती असताना ओमानच्या दौऱ्यावर गेले होते. या वेळी ओमानचे सुलतान होते काबुस बीन सैद. शंकरदयाळ शर्मांचे विमान मस्कत विमानतळावर उतरले. या वेळी स्वागताला स्वतः सुलतान उपस्थित होते. ते विमानात गेले. शंकरदयाळ शर्मा ज्या खुर्चीवर बसले होते. तेथे जाऊन त्यांचे स्वागत त्यांनी केले.** कितीही उच्चपदस्थ व्यक्ती आली, तरीही ओमानचे सुलतान स्वतः कधीही विमानतळावर जात नसत. परंतु या वेळी विमानातून त्यांनी शंकरदयाळ शर्मांना अतिशय आदरपूर्वक खाली आणले. फार मोठा स्वागत समारंभ घडवून आणला. त्यांच्या नियोजित मुक्कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी शंकरदयाळ शर्मा ज्या वेळेला गाडीत बसले. तेव्हा या सुलतानांनी स्वतः गाडी चालविली.

सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून सुलतानांनी शंकरदयाळ शर्मा यांना दिलेला आदर पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. पत्रकारांनी त्यांना शंकरदयाळ शर्मांना अशी वेगळी वागणूक का दिली? असा प्रश्न विचारला. त्या वेळेला ते सुलतान म्हणाले, **''मी सर्व प्रोटोकॉल बाजूला सारून शंकरदयाळ शर्मांचे आतिथ्य केले याचे कारण ते उच्चपदस्थ व्यक्ती आहेत म्हणून नाही, तर ते 'माझे शिक्षक' आहेत म्हणून. मी पुण्याला शिक्षणासाठी असताना त्यांच्या हाताखाली शिकण्याचे भाग्य मला मिळाले.** त्यांच्या ज्ञानकक्षा किती विस्तीर्ण आहेत याची जाणीव मला आहे. आपल्या गुरूंचा असा सन्मान करायचा नाही तर करायचा कोणाचा?''



## टाइम मॅनेजमेंट

सुप्रिया पुजारी, लाइफ कोच, समुपदेशक

# बस आणखी १० मिनिटं

**सातवीत असलेल्या आर्याला काही दिवसांत एक मोठी असाइनमेंट आहे,** मात्र ती तिच्या व्हिडिओ गेममध्ये पूर्ण गर्क झाली आहे. तिनं कितीही ठरवलं तरी, ''बस... आणखी १० मिनिटं,'' असं म्हणत ती असाइनमेंटसाठी उशीर करायचीच. असेच दिवस निघून गेले आणि असाइनमेंट काही झाली नाही. परिणामी शिक्षा मिळालीच व तिला स्वत:चाच राग आला. यालाच आपण **प्रोक्रॅस्टिनेशन (चालढकल)** असे म्हणतो.

अशा प्रकारच्या प्रोक्रॅस्टिनेशनचे अनेक लोक बळी ठरत आहेत, अगदी वयानं मोठेसुद्धा. प्रोक्रॅस्टिनेशनची अनेक उदाहरणे आहेत. आपण यापैकी कोणती मुद्दे अनुभवत आहात का?

**१. ब्रेक :** आपण १० मिनिटांचा ब्रेक घेतो, मोबाईल/टीव्ही पाहत बसतो आणि आणखी १० मिनिटं, असं म्हणत कधी वेळ निघून जातो कळत नाही.

**२. रूम आवरणं :** आपण अभ्यासाला बसतो, आजूबाजूला नजर गेल्यावर रूम आवरावी, असं वाटतं. रूम आवरण्यात वेळ गेल्याने अभ्यासाची इच्छाच निघून जाते.

**३. इंटरनेट ॲडिक्शन :** आपल्याला एक विशिष्ट माहिती हवी असते. ती शोधण्यासाठी आपण इंटरनेटवर सर्फिंग करतो. अचानक दुसरा मुद्दा आठवतो व आपण एका वेबसाइटवरून दुसऱ्या वेबसाइटवर क्लिक करतो. अमर्याद माहिती सतत समोर असल्यानं आपला वेळ निघून जातो व मूळ माहिती बाजूला राहते.

**४. परफेक्टचा अट्टाहास :** आपल्याला एखादा प्रोजेक्ट करायचा असतो. त्याची परफेक्ट पूर्वतयारी झाल्याशिवाय आपण प्रोजेक्ट सुरूच करत नाही. परिणामी प्रोजेक्ट उशिरा सुरू केल्यानं प्रोजेक्ट पूर्ण होत नाही.

**५. अति व्यवस्थापन :** वेळेचे व्यवस्थापन करण्यामध्ये अधिक वेळ गेल्यानं महत्त्वाचं काम राहूनच जातं.

प्रोक्रॅस्टिनेशन अनेक प्रकारे होतं, यावरचे उपाय आपण पुढील लेखात पाहू.

**लक्षात ठेवा :** **'बस...आणखी १० मिनिटे,''** असं म्हणत आपण विनाकारण वेळ घालवतो!

## वाचू आनंदे...


### भाषेची भिंगरी...

मित्रांनो, भाषेबद्दल तुम्हाला कमालीची उत्सुकता असते. कोण काय आणि कसं बोलतं हे तुम्ही लहानपणापासून निरीक्षणातून शिकत असतात. भाषेचं अनोखे सौंदर्य असतं. नीलिमा गुंडी यांनी 'भाषेची भिंगरी' पुस्तकात मुलांनी शब्दांचं बोट धरून केलेला गमतीशीर प्रवास केला आहे. यामध्ये गप्पा मारता मारता मुलांची गट्टी होते. काव्य, विनोद आणि खेळाच्या माध्यमातून भाषेतील खाचखळगे समजून सांगितले आहेत. मुलांच्या मनात नव्यानं अंकुरणारी आणि बाह्यजगतातील भाषा, यातील चित्रण हळुवारपणे मांडलं आहे. मनोविकास प्रकाशनानं हे पुस्तक मुलांसाठी प्रकाशित केले आहे. मुलांच्या रंगलेल्या गप्पागोष्टींमधून भाषेचं अद्भूत जग उलगडत नेलं आहे. भाषेतील अनेक गमतीजमती सांगताना व्याकरणाचा कोठेही बागूलबुवा केलेला नाही. भाषा शिक्षणाची अनोखी वाट या पुस्तकानं खुली करून दिली आहे.

## हाक वसुंधरेची

# ऋतुमानानुसार वेशभूषा

**पावसाळ्यात छत्र्या, रेनकोट आणि डोरली तयार करून ठेवतो** आणि पावसाळ्यातही इकडे तिकडे हिंडण्याची व्यवस्था करतो. त्याचप्रमाणे हिवाळ्यात थंडीपासून बचावासाठी लोकरीची वस्त्रे आणि खूपच थंडी असेल तर उष्णता निर्माण करण्यासाठी जाळावयाची लाकडे यांची सोय करून ठेवतो. उन्हाळ्यामध्ये उन्हापासून संरक्षण म्हणून डोक्यावरून फडके गुंडाळून किंवा टोपी घालून किंवा छत्री घेऊनच आपण बाहेर पडतो. म्हणजेच आपण ऋतुमानाप्रमाणे वेशभूषा करतो, ऋतुमानाप्रमाणेच खाण्याच्या पद्धती बदलतो. ऋतुमानाप्रमाणेच उन्हाळ्यात मुलांना त्रास होऊ नये म्हणून शाळांना सुटी देतो.



**निसर्गात ही वेगवेगळ्या ऋतूमध्ये वेगवेगळी फळे, फुले, झाडे यांची ऋतुमानानुसार पैदास होत असते.** उन्हाळ्यात आपल्याला आंबे, जांभळं, करवंदे, संत्री वगैरे फळे मिळतात. हिवाळ्यात भाज्यांची रेलचेल असते. **मासे पावसाळ्यात मिळत नाहीत. कारण तो त्यांच्या पैदाशीचा काळ असतो. आपण पावसाळ्यात मांस, मच्छी खाणे टाळतो. कारण त्या वेळी वाहणाऱ्या पाण्यातून रोगराई पसरण्याचा जास्त धोका असतो.** या सर्व उदाहरणावरून आपल्याला थोडीशी कल्पना आलीच असेल की आपली जीवनपद्धती कशी आपण ऋतुमानाप्रमाणे आणि निसर्गाशी जुळवून घेण्यामुळेच सुखकारक व आरोग्यपूर्ण ठेवतो.

## योग जीवन

मनाली देव

# उष्ट्रासन

**उष्ट्रासन हे बैठक स्थितीमधील आसन आहे. उष्ट्र म्हणजे उंट. या आसनाची अंतिम स्थिती उंटाप्रमाणे दिसते म्हणून याला उष्ट्रासन म्हणतात.**

### असे करावे आसन

- प्रथम वज्रासनात बसावे नंतर सावकाश गुडघ्यावर उभे राहावे.
- त्यानंतर दोन्ही हात समोर घेऊन एकेक हात वरून मागच्या बाजूला घ्यावा व टाच पकडायचा प्रयत्न करावा.
- उजव्या हाताने उजव्या पायाची टाच व डाव्या हाताने डाव्या पायाची टाच पकडावी. किंवा संपूर्ण तळपायावर तळहात ठेवावे.
- त्यानंतर मान मागच्या बाजूला झुकवावी. श्वसन संथ सुरू ठेवावे.
- दोन्ही हातांचे कोपरे ताठ असावेत. कमरेतून जेवढे मागे वागता येईल तेवढे वाकावे. आसन स्थितीमध्ये शक्य तेवढा वेळ स्थिर रहावे.
- आसन सावकाश सोडावे व मार्जरासन करावे. म्हणजे कमरेवर आलेला ताण कमी होईल.

### फायदा :

- आसनाच्या नियमित सरावाने गळा, छाती, पोट, मांडीचा पुढचा भाग ताणला जातो व त्यांची कार्यक्षमता वाढते.
- मधुमेह व दम्याच्या रुग्णांना उपयुक्त आसन आहे.
- फुप्फुसांची कार्यक्षमता वाढण्यासाठी मदत होते.
- कंबरदुखी, पाठदुखी कमी होण्यासाठी मदत होते.
- थायरॉईड या व्याधीवर उपयुक्त.
- स्टॅमिना कमी आहे किंवा फोबिया आहे त्यांनी हे आसन नियमित करावे.



**काळजी :**

- गुडघेदुखी, व्हर्टिगो किंवा मणक्याचे तीव्र आजार आहेत त्यांनी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

## गुड मॅनर्स

# दुसऱ्यांना मदत करणे

दुसऱ्यांना मदत करणं हा खूप चांगला गुण आहे, बरं का मित्रांनो. घरात कामं करायलाच पाहिजेत; परंतु अगदी शाळेत, बाहेर, इतर ठिकाणी, सगळीकडे हा मंत्र तुम्ही लक्षात ठेवा. आवश्यकता आहे, त्यांना मदत केल्याचे समाधान खूप चांगलं असतं. तुम्ही मदत करत राहिलात, तर तुम्हाला सगळे छान म्हणतील आणि तुम्हालाही खूप छान वाटेल. त्याचबरोबर तुम्हालाही कधी कोणाच्या मदतीची आवश्यकता पडल्यास अनेक जण त्यासाठी पुढाकार घेतील. कधी एखाद्या आजोबांना रस्ता क्रॉस करायला मदत करणं, कधी एखाद्या गरीब मुलाला तुमचे कपडे किंवा खेळणी देणं, कुणी आजारी असल्यास त्याला कामात मदत करणं, औषधं देणं, अशी कामं तुम्ही नेहमी करत जा. अगदी मोठी मदत केली पाहिजे असं काही नाही. अगदी छोटीशी मदतही कुणासाठी खूप मोठी ठरू शकते. भले त्यासाठी थोडा त्रास पडला किंवा काही वेळ गेला तरी चालेल. मदत करताना कोणतीही उपकाराची भावना मनात ठेवता कामा नये.

> Success is not final, failure is not fatal: it is the courage to continue that count. — Winston Churchill

Elevate Your Institution's Excellence with English Language and Soft Skills Training!

Aspiring™ Careers
Learn to Grow...

**Scholar Edge**
(For Std. 1 to 12)
(English for School Students)

Our Comprehensive English Language Programme:
- Elevates student's Listening, Speaking, Reading and Writing skills
- Enhances Creative skills & critical thinking
- Prepares them for academic success

**Career Readiness Programme**
Employability Skills Training for College Students

Soft Skills Development:
- Equips students with essential life skills
- Fosters leadership qualities
- Enhances teamwork and communication
- Improves interview skills




Partner with us to empower your students!
+91 77680 29797
www.aspiringcareers.in
Your Trusted Training Partner

## अवतीभवती

हत्ती हा छोट्या दोस्तांचा आवडता प्राणी. तुम्ही टीव्हीवर, यू-ट्यूबवर हत्तींचे व्हिडिओ बघत असाल ना? कुणी प्राणिसंग्रहालयात प्रत्यक्षही बघितले असतील. या हत्तींविषयीची माहिती आज आपण बघूया. रेडी ना?



# विशालकाय हत्ती

**आफ्रिकी हत्ती आफ्रिका खंडात आढळतात, तर आशियाई हत्ती आशिया खंडात. भारत, श्रीलंकेत आढळतात ते आशियाई हत्ती. आफ्रिकी हत्ती आकारानं मोठे असतात आणि त्यांचे कानही मोठे असतात. आपल्याकडचे हत्ती तुलनेनं लहान असतात आणि त्यांचे कानही लहान असतात. आफ्रिकी हत्तींचं वजन आशियाई हत्तींपेक्षा जास्त असतं. बाबो! काय ते वजन!**

**हत्तींचे दोन मोठे दात आपल्याला दिसतात.** हे हस्तिदंत म्हणजे आपल्याला असतात त्या सुळ्यांचंच एक प्रकारचं अवाढव्य रूप. अर्थात, त्याच्या तोंडातही दात असतात आणि अन्न चावण्यासाठी ते त्याच दांतांचा वापर करतात. मग हे एवढे मोठे सुळे कशासाठी असतात बरं? हत्ती बहुतेकदा त्यांचा वापर विविध प्रकारचे अन्नपदार्थ फोडण्यासाठी करतात. फांद्या तोडणं, झाडं मुळापासून उखडणं वगैरेंसाठी. या हस्तिदंतांचा सगळ्यांत मोठा वापर संरक्षणासाठी असतो. सोंड हा अवयव हत्तींसाठी अतिशय महत्त्वाचा असतो, त्यामुळे विशेषतः त्यांचं संरक्षण करण्यासाठी या सुळ्यांचा वापर केला जातो. सगळ्या हत्तींना सुळे असतीलच असं मात्र नाही हं.

**हत्तीच्या सोंडेत किती स्नायू असतात माहीत आहे? तब्बल चाळीस हजार.** स्नायूंचे हे छोटे छोटे भाग असल्यामुळेच हत्ती या सोंडेचा पाहिजे तसा वापर करू शकतात. हत्तींचं वजन जास्त असल्यामुळं त्यांचं बाकीचं शरीर तितकं लवचिक नसतं, त्यामुळं निसर्गानं त्यांना अनेक कामांसाठी मदत म्हणून ही सोंड दिली आहे. या सोंडेचा वापर हत्ती पाणी पिणं, खाणं तोंडात घालणं आणि हो... स्नान करण्यासारख्या इतर अनेक गोष्टींसाठी करतात. सोंडेमार्फत हत्ती तब्बल साडेतीनशे किलोंपर्यंत वजन उचलू शकतो आणि अगदी शेंगदाण्यासारखी बारीक वस्तू फोडण्याइतकं नेमकं काम करू शकतो.

**हत्ती रोज तब्बल १३६ किलोंपर्यंत अन्न खाऊ शकतात. आणि हो, हत्ती शाकाहारी असतात बरं का. हत्ती सतत खात असतात. हत्ती पाणीही भरपूर पितात. ते रोज चाळीस लिटरपर्यंत पाणी पितात.**

## मेंदू तब्बल साडेसहा किलोंचा

**हत्ती हे सर्वांत स्मार्ट प्राण्यांपैकी एक आहेत.** त्यांचा मेंदू तब्बल साडेपाच किलोंचा असतो. त्यांच्या मज्जासंस्थेत ८६ हजार अब्ज न्युरॉन्स म्हणजे चेतापेशी असतात. त्यामुळे अर्थातच त्यांच्या अनेक कृतींमागे बुद्धिमत्ता असते. त्यांचा मेंदू मानवाच्या मेंदूइतकाच गुंतागुंतीचा असतो, त्यामुळे इतर प्राणी करू शकणार नाहीत अशा कित्येक गोष्टी हत्ती करू शकतात. त्यांची स्मृती तल्लख राहते ती या मेंदूमुळेच.

**हत्ती कुटुंबवत्सल असतात. हत्तींच्या मादी त्यांच्या पिल्लांवर खूप प्रेम करतात आणि ती पिल्लं नेहमी आईजवळ असतात. हत्ती नेहमी कळपात राहतात आणि एकमेकांना मदत करत असतात. हत्ती त्यांच्या कुटुंबातल्या सदस्यांवर प्रेम करतात आणि एखाद्या सदस्याचा मृत्यू झाल्यावर त्या ठिकाणी ते पुन्हा येतात, असंही आढळून आलं आहे.**



**'हत्ती कधीच विसरत नाहीत'** या अर्थाची एक म्हण आहे. हे थोडंसं अतिशयोक्तीपूर्ण असलं, तरी हत्तींची स्मरणशक्ती अफाट असते हे मात्र खरं. हत्तींवर केलेल्या अनेक प्रयोगांतून ते सिद्ध झालं आहे. **हत्ती पन्नास ते साठ वर्षे जगतात आणि विशेषतः पाण्याच्या, खाणं मिळण्याच्या जागा त्यांच्या आयुष्यभर लक्षात राहतात.** त्यांना ज्यांनी हानी पोचवली असेल, त्यांनाही ते लक्षात ठेवतात असं स्पष्ट झालं आहे.

- हत्ती उडी मारू शकत नाहीत.
- हत्ती खाण्याचं काम रोज सरासरी सोळा तासांपर्यंत करू शकतात.
- हत्ती हा थायलंडचा राष्ट्रीय प्राणी आहे.
- हत्ती पोहू शकतात.
- हत्ती काही विशिष्ट आवाज, गंध, जमिनीवर पाय आदळून तयार होणारा आवाज आणि इतर प्रकारे संवाद साधतात.

## असं का?...

## रातराणी रात्रीच का फुलते?




**परागीभवनासाठी फुलांना कीटकांना आकर्षित करायचं असतं.** आता काही कीटक असे असतात, की जे रात्रीसुद्धा काम करत असतात. त्यांना म्हणतात 'निशाचर'. या अशा कीटकांना आकर्षित करण्यासाठी रातराणीची फुलं रात्री फुलतात. आता रात्री तर अंधार असतो.

त्या वेळी ही फुलं खूप आकर्षक असून काही उपयोग नाही, बरोबर ना? म्हणून मग निसर्गानं या रात्री फुलणाऱ्या फुलांना रंग पांढरा किंवा कमी आकर्षक दिलेला असतो, पण त्यांचा वास मात्र असा असतो की कीटक येणारच. म्हणून या रातराणीचा घमघमाट इतका असतो. रात्री फुलण्याचा रातराणीला एक फायदा असाही असतो, की त्यावेळी इतर फुलं मिटलेली असल्यामुळे परागीभवनासाठी इतर फुलांशी रातराणीची स्पर्धा कमी होते. थोडक्यात सांगायचं तर, रातराणीचं नावही सार्थ होतं आणि तिचं साम्राज्य कायम राहतं.

## उन्हाळ्यात झाडांची पानं का गळतात?

**उन्हाळ्यात झाडांनीही खास उपाययोजना केली आहे.** झाडांच्या पानांमधून बाष्पीभवनाद्वारे पाणी बाहेर जातं. एरवी मुळांतून पाणी झाडं आत घेतात, त्यांचं अन्न तयार करतात आणि जास्तीचं पाणी पानांच्या छिद्रांमधून बाहेर टाकतात; पण उन्हाळ्यात इतकं पाणी बाहेर टाकणं झाडांना परवडत नाही. त्यामुळंच मग त्यांची पानं गळायला लागतात. नंतर पावसाळ्यात भरपूर पाणी उपलब्ध होतं, तेव्हा पुन्हा त्यांना छान पालवी फुटायला लागते.

## आकाश निळं का दिसतं?



**खरं तर आकाशाला कुठला रंगच नसतो.** आपल्याला आकाशाचा रंग दिसतो ना, तो असतो सूर्यामुळे. सूर्याचे किरण वातावरणातून आपल्यापर्यंत येतात. कोणतेही प्रकाशकिरण अत्यंत लहान आकाराच्या कणावर पडल्यावर सर्व दिशांना पसरतो. याला म्हणतात प्रकाशाचं 'विकिरण.' आकाश निळे दिसण्यामागचा मूळ संबंध वातावरणातून प्रकाशाच्या या विकिरणाशी आहे. सूर्यप्रकाश वातावरणातून जातो त्या वेळी या वातावरणात सूर्याच्या किरणांमधील बाकीचे रंग शोषले जातात आणि निळा रंग आपल्यापर्यंत पोचतो. निळ्या रंगाची तरंग लांबी कमी असल्यामुळे या रंगाचं जास्त प्रमाणात विकिरण होतं. विकिरण झालेला हा प्रकाश आपल्याला दिसत असल्यानं आकाश निळं भासतं. अर्थात, सूर्याचे किरण आपल्याबरोबर डोक्यावर आहेत का, तिरके येतात का किंवा इतर गोष्टींवरसुद्धा हा रंग ठरत असतो. त्यामुळे कधी कधी आपल्याला हेच आकाश तांबूस किंवा इतर वेगळ्या रंगांचंसुद्धा दिसतं.


## "SAKAL NIE' ॲप

**Sakal NIE शैक्षणिक ॲप, इयत्ता पाचवी ते दहावीच्या मराठी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.**
शालेय पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्यावरील स्वाध्याय प्रश्नोत्तरे, कविता संगीतबद्ध आणि कराओके रूपात, तसेच दैनंदिन अभ्यासाची उजळणी, चाचणी परीक्षा, मूल्यशिक्षण आधारित साहित्य, ६०००पेक्षा अधिक व्हिडिओ उपलब्ध करून दिले आहेत. विद्यार्थ्यांना गृहपाठासाठी या ॲपचा नक्की उपयोग होईल.



सकाळ NiE ॲपचे फायदे

- शालेय शिक्षणास पूरक उजळणीचे व्हिडिओ
- धडा लक्षात ठेवण्याचे तंत्र
- एकाग्रतेसाठी धडे ऐकण्याची सुविधा आणि बालभारतीच्या धड्यानुसार ई-पुस्तके
- धड्याखालील सोडविलेले स्वाध्याय आणि इंटरॅक्टिव्ह प्रश्नोत्तरे
- परीक्षेच्या तयारीसाठी टेस्ट सीरिज, स्कॉलरशिप सराव प्रश्नसंच.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यशिक्षण, ध्यान, योग, मेमरी टेक्निक व शिक्षणोपयोगी व्हिडिओंचा स्वतंत्र विभाग
- माहिती तंत्रज्ञानाची कौशल्ये याविषयीची पूर्ण माहिती व मार्गदर्शन



शेजारील QR कोड स्कॅन करून 'प्ले स्टोअर'वरून ॲप आताच डाउनलोड व इन्स्टॉल करा! NIE सभासद असाल तर १ वर्षाचे फ्री सबस्क्रिप्शन मिळवण्यासाठी ९८८१५ ९८८१५ वर कॉल करा!


> "Your time is limited, so don't waste it living someone else's life. — Steve Jobs

हे का करावे?

## व्यायाम का करावा?

व्यायामाने शरीर तंदुरुस्त राहते आणि मन ताजेतवाने राहते. व्यायाम हा आपला नित्यनेमाचा कार्यक्रम असला पाहिजे, असे आपण अनेक वेळा शाळेतील पुस्तकात वाचले असेल आणि इतरही अनेक कार्यक्रमातून आपल्याला ते ऐकायलाही मिळते. चला तर मग, आज आपण जाणून घेऊयात व्यायामाचे फायदे.

व्यायाम केल्याने सुदृढ दीर्घायुष्य लाभते. कारण व्यायामामुळे शरीरातील वृद्धत्वाकडे जाणारी प्रक्रिया मंद होते. अशा व्यक्तींचे जीवन केवळ दीर्घच असते असे नव्हे, तर ते वेदनांपासून आणि पीडांपासून दूर असते. शरीरातील अवयवांचा एकमेकांशी उत्तम समन्वय साधला जातो. नियमितपणे व्यायाम केल्याने डाव्या आणि उजव्या बाजूत चांगला समन्वय साधला जातो.

व्यायाम करणाऱ्यांची विचार करण्याची पद्धत सकारात्मक असते, त्यामुळे त्यांची उत्पादकताही चांगली असते. व्यायाम करणाऱ्या व्यक्तीची हाडे मजबूत असतात, त्यामुळे पडणे, धडपडणे, मुरगळणे अशा गोष्टींचा त्रास त्यांना होत नाही.

व्यायाम करणाऱ्याचे हृदय निरोगी असते. त्यामुळे हृदयाचे ठोके सामान्य असतात. अशा व्यक्तींच्या रक्तवाहिन्या निर्दोष असतात, रक्तदाब नियंत्रणात राहतो आणि त्यांना रक्तदाबाशी संबंधित विकारांचा त्रास होत नाही. त्यामुळे त्यांना विविध हृदयविकारांपासून मुक्ती मिळते. त्यांना तणावाचा चांगला सामना करता येतो. कारण विविध हार्मोन्स स्रवत असल्याने त्यांचा आत्मविश्वास आणि आनंद दोन्हीत वाढ झालेली असते.

## डायरी का लिहावी?

दोस्तानो, तुम्ही कधी डायरी लिहिली आहे का? किंवा संपूर्ण दिवसभरात तुम्ही काय करणार आहात ते डायरीत लिहून काढले आहे का? डायरी लिहिण्याची सवय बऱ्यापैकी चांगली मानली जाते. दिवसभरात तुम्ही काय केलं, काय मिळवलं आणि काय गमावलं, हे यात दाखवण्यात येतं. चला तर मग, डायरी लिहिण्याच्या फायद्यांविषयी जाणून घेऊयात.



डायरी लिहिण्यामुळं तुम्ही तुमच्या मनातील गोष्टी सहज बोलू शकाल. दैनंदिन जीवनात डायरी लिहिण्याची सवय लावली, तर आपल्या मनातील भावना किंवा गोष्टी अधिक चांगल्या प्रकारे लोकांना सांगता येतील. आजच्या धकाधकीच्या जीवनात लोकांना वेळ फारच कमी असतो. अशा वेळी तुमचे म्हणणे ऐकून घेणारे कोणी नसेल, तर डायरी लिहिल्यानं तुमचा एकटेपणा कमी होईल. तुम्हाला शाळेत दिलेला गृहपाठ शिक्षकांनी दिलेल्या तारखेला जमा करायचा असतो; पण अनेक जण तो आणायला विसरतात. अशी स्थिती टाळण्यासाठी डायरी उपयोगी पडेल. मोबाईल आणि लॅपटॉपच्या जगात अनेकांची लेखनाची सवयही सुटते. अशा परिस्थितीत डायरी लिहिण्यामुळं भाषेवर पकड राहील. तुम्ही तुमची ध्येयं डायरीत लिहिलीत, तर डायरी वाचताना तुम्हाला तुमचं ध्येय लक्षात राहील आणि त्यावर चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करता येईल.

स्किल्स बकेट...



# शिक्षक बनायचंय?

**मित्रांनो, शिक्षक दिन नुकताच साजरा झाला. त्यात तुमच्यापैकी अनेकांनी त्या दिवशी शाळेत शिकवण्याची संधी साधली असेल.** मजा आली ना? काही जणांना आतापर्यंत शिकवणं हे खूप सोपं वाटत असेल, त्यांना त्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते हे लक्षात आलं असेल. ज्यांना शिक्षक दिनानिमित्त शिकवण्याची मजा आली असेल, त्यांना या क्षेत्रात पुढं करिअरसुद्धा करता येईल. शिकणं ही जितकी आनंददायी प्रक्रिया असते, तितकीच शिकवण्याची प्रक्रियाही आनंददायी असते बरंका.

मित्र-मैत्रिणींनो, तुम्ही डीएड करून प्राथमिक शाळेत शिकवू शकता, बीएड करून माध्यमिक शाळेत शिकवू शकता किंवा सेट, नेट अशा परीक्षा देऊन महाविद्यालयांतसुद्धा शिकवू शकता. तुम्हाला खरंच शिकवण्यात खूप इंटरेस्ट असेल, तर तुम्ही महाविद्यालयीन शिक्षणानंतर पीएचडी करून शिक्षण क्षेत्रात आणखी पुढे जाऊ शकता. अर्थात, ज्यांना अध्यापन क्षेत्रात करिअर करायचं आहे, त्यांच्यासाठी फक्त शाळा किंवा महाविद्यालयांतच शिकवणं एवढाच पर्याय नाही. तुम्ही स्वतःची ट्युशन सुरू करू शकता, विविध पुस्तकं लिहू शकता. बरं, फक्त प्रत्यक्षच शिकवायला पाहिजे असंही आता आवश्यक नाही. तुम्ही स्वतःचं यू-ट्यूब चॅनेल सुरू करून त्यावर छानपैकी टॉपिक्स निवडून शिकवण्याचे व्हिडिओ तयार करू शकता. हल्ली शिकवण्याशी संबंधित अनेक ॲप्स सुरू झाली आहेत. तुम्ही त्यांच्यामध्येही काम करू शकता. शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये फक्त शिकवणं एवढंच काम नसतं, इतरही खूप कामं असतात. व्यवस्थापन, प्रशासन, आर्थिक आणि इतर अनेक कामं असतात. तुम्ही शालेय व्यवस्थापनासारखे अभ्यासक्रम करून तीही कामं करू शकता. आणि हो, खूप पॅशन असेल, तर परदेशांत जाऊनसुद्धा शिकवता येतं बरं का. मित्र-मैत्रिणींनो, शिक्षक बनणं वाटतं तितकं सोपं मात्र नाही. तुम्हाला खरंच अध्यापनाची दिशा पकडायची असेल, तर मुळात एखादा विषय समजून घेऊन तो दुसऱ्याला समजावून सांगण्याची हातोटी हवी. मातृभाषेवर प्रभुत्व पाहिजेच; पण इंग्लिशवरही प्रभुत्व हवे. वर्गात समोर किती मुलं असतील सांगता येत नाही, त्यामुळं स्टेज डेअरिंग तर पाहिजेच. सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे तुम्ही जेव्हा मोठ्या समूहासाठी शिक्षक म्हणून काम करता, तेव्हा तुम्हाला त्या विद्यार्थ्यांचं कल्याणच करायचं आहे अशी मानसिकता हवी. त्यामुळं त्यासाठी तुमचं हृदय विशाल पाहिजे, सगळ्यांना आपलंसं करता आलं पाहिजे आणि हे कौशल्य तुम्ही शाळेपासून अंगी बाणवू शकता. कोणत्याही शिक्षकाचं काम तेव्हाच ठसतं, जेव्हा तो 'रिलेव्हंट' असतो, म्हणजे तो काळाबरोबर चालतो. फक्त शिकवला जाणारा विषयच नव्हे, तर सगळ्याच क्षेत्रांमध्ये कोणत्या कोणत्या नव्या घडामोडी सुरू आहेत, कोणते बदल होत आहेत हे शिक्षकांना माहिती पाहिजे. तुमच्यात ही क्षमता आहे का, याचाही विचार करा आणि मग आत्मविश्वासानं क्षेत्रात उतरा.

### या क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी

- शिकवण्याची आवड असणं गरजेचं आहे. एखादा विषय आपल्याला समजणं हे वेगळं आणि समजलेला विषय इतरांपर्यंत पोचवणं हे वेगळं. विषय इतरांपर्यंत पोचवणं ही एक कला आहे. ही कला अवगत असायला हवी.
- संवादकौशल्य हवं. स्टेज डेअरिंग हवं. भाषांवर प्रभुत्व पाहिजे
- भरपूर वाचन, विषयाचं ज्ञान, अभ्यासाची आवड असायला हवी.
- सतत नवनवीन गोष्टी जाणून घेण्याचं कुतूहल पाहिजे.

आपण मोठे झाल्यावर शिकवू शकतो असं काही नाही. तुम्ही आता शालेय वयातसुद्धा शिकवण्याचं काम करू शकता. सोसायटीत तुमच्यापेक्षा लहान असलेल्या मुलांना शिकवू शकता. आई-बाबांच्या मदतीनं काही सामाजिक संस्थांमध्येसुद्धा जाऊन गरजूंना विविध गोष्टी शिकवण्याचं काम करू शकता.

# वाढवू कल्पनाशक्ती

**दोस्तांनो, कल्पनाशक्तीतून खूप काही साध्य होऊ शकतं. कल्पनाशक्तीमुळं नाटकं, चित्रपट, कथा अशा अनेक गोष्टी जन्माला येऊ शकतात, कॅनव्हासवर त्या कल्पना मांडता येऊ शकतात, अनेक यंत्रांची, प्रकल्पांची निर्मिती होऊ शकते. कल्पनेसाठी कोणतीही गुंतवणूक लागत नाही; पण ती शक्ती फुलवावी लागते. एखादी छोटी कल्पना तुमचं आयुष्य बदलू शकते. ही कल्पनाशक्ती वाढवायची कशी? चला बघूया.**



### स्वतःला केंद्रस्थानी ठेवा

तुम्हाला सुचणाऱ्या कल्पनेचा केंद्रस्थानी तुम्हीच असलात, तर त्या कल्पनेचं मूल्य वाढतं. म्हणून स्वतःच्या कामात बदलापासून स्वतः तयार करत असलेल्या गोष्टीबाबत कल्पना सुचतात का ते बघा. जेव्हा तुमच्या नेहमीच्या कामात छोट्या कल्पनेमुळे फरक पडेल आणि त्याचा दर्जा वाढेल, तेव्हा त्या कल्पनेचं महत्त्व तुमच्या लक्षात येईल.

### कल्पक माणूस पुढे जातो

कल्पक माणूसच पुढे जात असतो, हे नेहमी लक्षात ठेवा. म्हणजे, एकच काम दोन माणसं करत असतील आणि एक चौकटबद्ध विचार करणारा आणि दुसरा कल्पक असेल, तर कल्पक माणसाचं काम हे जास्त उत्तम असतं. तो नेहमीच्याच कामाला वेगळा अँगल देतो. त्यातून त्याच्या संस्थेला, आजूबाजूच्या व्यक्तींना आणि त्या माणसालाही फायदा होतो. त्या व्यक्तीची प्रगती होत जाते.

### प्रत्येक नवीन कल्पना मोलाचीच

मित्र-मैत्रिणींनो, कोणतीही कल्पना निरुपयोगी नसते. उलट, तुम्ही नीट बघितलंत, तर अनेक बिनमहत्त्वाच्या वाटणाऱ्या कल्पनांनीच पुढं खूप मोठा बदल घडवून आणल्याचं दिसेल. त्यामुळं कल्पना तुमच्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित असो, की एखाद्या नवीन नाटकाच्या कथेशी संबंधित असो. तिचं महत्त्व लगेच मोजण्याच्या फंदात पडू नका.

### तक्रारीचा सूर नको

मला नवं काही सुचत नाही, नवीन विषय सुचत नाहीत, अशी तक्रार अजिबात करत बसू नका. ज्याला नवीन काही सुचतच नाही असं कोणीच नसतं. प्रत्येकाला काही ना काही अतिशय वेगळं, छान सुचत असतं. फक्त कदाचित त्याचं महत्त्व लक्षात येत नसतं. म्हणूनच जे जे कल्पक वाटेल ते ते लिहून काढायची किंवा जवळच्या मित्राला किंवा मैत्रिणीला सांगायची सवय लावून घ्या.

### कल्पनांची डायरी लिहा

कल्पना सुचणं ही जशी देणगी असते, तसं ते कौशल्य विकसितसुद्धा होऊ शकतं. त्यासाठी एखादी कल्पनांची डायरी लिहिता येते का ते बघा. म्हणजे बघा बरं, गृहपाठ कसा लवकर संपवता येईल याच्या काही कल्पना तुम्हाला सुचतात का ते लिहून बघा. घरातली रचना बदलण्यासाठी काही कल्पना सुचते का ते बघा. फार कशाला, एखाद्या यंत्राची कल्पना तुम्हाला सुचत असेल, तर तीही लिहून काढा. ते यंत्र तुम्हीच विकसित करायला पाहिजे असं नाही; पण त्याची नुसती कल्पनाही अतिशय महत्त्वाची असते. आपण नित्यनेमानं व्यायाम करतो, तशा प्रकारे नित्यनेमानं सुचलेल्या कल्पना लिहून काढत चला. जशा कल्पना लिहून काढाल, तशा नवनवीन कल्पना सुचत जातील.

अधिक माहितीसाठी 'बीकम ॲन आयडिया मशीन' हे पुस्तक किंवा अशी पुस्तकं नक्की वाचा. आई-बाबांची मदत घ्या. यू-ट्यूबवर कल्पनाशक्तीबाबत अनेक व्हिडिओज असतात, तेही बघा.

### कल्पक व्यक्तींचा सहवास

कल्पनाशीलता वाढण्यासाठी तशाच प्रकारच्या मित्र-मैत्रिणींचा सहवास आवश्यक आहे. तुम्ही दर वेळी छान काही तरी सांगता, सुचवता आणि एखादा मित्र त्यात खोडा घालत असेल, तर तुम्हाला ते मांडावंसं वाटणार नाही. याच्या उलट कधी एखाद्या मैत्रिणीची दाद तुम्हाला छान काही सुचण्यासाठी 'ॲक्सिलरेटर' म्हणून काम करू शकते.

" In life you make the small decisions with your head and the big decisions with your heart. — Omid Kordgstani

visit sakalnie.in

‘सकाळ’ सादर करीत आहे

# मुलांचं हक्काचं वृत्तपत्र !

- वृत्तपत्रासोबत मोफत अ‍ॅप, ज्ञान, माहिती, मनोरंजन -

## खालील ऑफर बघा आणि आजच आपला अंक बुक करा.

NIE अ‍ॅपचे १ वर्षाचे ~~₹2000~~ चे फ्री सबस्क्रिप्शन!

सकाळ NIE अ‍ॅप डाउनलोड करण्यासाठी खालील QR स्कॅन करा

## आता अंक घरपोच!

सकाळ NIE NEWSPAPER IN EDUCATION

वार्षिक वर्गणी फक्त ₹ ३००/-




## ६००० + शैक्षणिक व्हिडीओज + ५वी व ८वीचे स्कॉलरशिप सराव पेपर्स + अभ्यासाची दैनंदिन उजळणी

'Sakal NIE शैक्षणिक अ‍ॅप, इयत्ता **५ वी ते १० वीच्या 'मराठी' व 'सेमी इंग्रजी'** माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे. **शालेय पाठ्य-पुस्तकातील प्रत्येक धड्यावरील स्वाध्याय प्रश्नोत्तरे, कविता संगीतबद्ध** आणि **कराओके स्वरूपात, तसेच दैनंदिन अभ्यासाची उजळणी, चाचणी परीक्षा, मूल्य-शिक्षण आधारीत साहित्य, ६००० + व्हिडीओज** उपलब्ध करून दिले आहेत. विद्यार्थ्यांना गृहपाठासाठी या अ‍ॅपचा नक्की फायदा होईल.

### Sakal NIE अ‍ॅपचे फायदे :

- शालेय शिक्षणास पूरक उजळणीचे व्हिडीओज
- धडा लक्षात ठेवण्याचे तंत्र
- एकाग्रतेसाठी धडे ऐकण्याची सुविधा आणि बालभारतीच्या धड्यानुसार ई-पुस्तके
- धड्याखालील सोडविलेले स्वाध्याय आणि इंटरअ‍ॅक्टिव्ह प्रश्नोत्तरे
- परीक्षेच्या तयारीसाठी टेस्ट सिरीज, स्कॉलरशिप सराव प्रश्नसंच
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यशिक्षण, ध्यान, योग, मेमरी टेक्निक व शिक्षणोपयोगी व्हिडीओजचा स्वतंत्र विभाग
- माहिती तंत्रज्ञानाची कौशल्ये याविषयीची पूर्ण माहिती व मार्गदर्शन आहे.

### विनामूल्य इव्हेंट

- महात्मा गांधी जयंती — Online Event
- बालकुमार चित्रकला स्पर्धा — Offline Event
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती — Online Event
- छत्रपती शिवाजी महाराज जयंती — Online Event
- आंतरशालेय सूर्यनमस्कार स्पर्धा

### सशुल्क इव्हेंट

- इको गणेश मूर्ती, मखर व सजावट कार्यशाळा, सोपे लेखन
- आकाशकंदील बनवणे स्पर्धा
- सकाळ स्कुलिंपिक्स

*काही उपक्रम निवडक शहरांमध्ये.

### प्रत्येक शुक्रवारी | १२ पानी रंगीत अंक | विविध विषयांवरील मनोरंजक सदरे

### NIE अंकामध्ये प्रसिध्द होणारी माहितीपर आणि मनोरंजक सदरे :

**जनरल नॉलेज :** इतिहास, भूगोल, विज्ञानातल्या फॅक्ट्स, नवीन टेक्नॉलॉजीची माहिती । **नव्या गोष्टी शिकूया! :** वेळेचं महत्त्व, छंद जोपासणं आणि सकारात्मक विचार **आरोग्य :** डाएट, योग्य दिनक्रम, व्यायाम याची गोडी लावणारी माहिती । **शिदोरी :** श्लोक, सुविचार, चिंटू, ग्राफिटी आणि धमाल विनोद **हे करून पाहा :** कोडी, सुडोकू, चित्रकला **माझं पान :** शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी लिहिलेले साहित्य, *** ५वी व ८वी स्कॉलरशिपचे पूर्ण पान**

**सकाळ NIE चा अंक घरपोच मिळविण्यासाठी यासोबत जोडलेला वर्गणीदार नोंदणी फॉर्म व वर्गणी रक्कम रु.३०० (रोख स्वरूपात), आपल्या वृत्तपत्र विक्रेत्याकडे किंवा एजंटकडे जमा करावी.**

### ‘सकाळ NIE’ या उपक्रमात सहभागी झाल्यावर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा :

१) सभासदत्व स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांची वाचनकौशल्ये विकसित करण्यासाठी शैक्षणिक वर्षात NIE चे साप्ताहिक स्वरूपातील १२ पानी अंक ( दर शुक्रवारी ) वितरीत केले जातील.

२) विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त असे ‘NIE एज्युकेशनल अ‍ॅप’.

३) आपल्या विद्यालयातील, दहावीत ८५% हून अधिक गुण असलेल्या आर्थिकदृष्ट्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांना सकाळ इंडिया फाउंडेशनच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची संधी (नियम व अटी पूर्ण करणाऱ्या निवडक गरजू विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.)

### मुख्याध्यापक व शाळेसाठी मिळणाऱ्या सुविधा :

१) ‘सकाळ माध्यम समूहा’ च्या वतीने शालेय स्तरावरील विविध कार्यक्रमांचे आयोजन.

२) ज्या विद्यालयांमधून किमान ३०० विद्यार्थी NIE अंकांची नोंद करतील, त्या विद्यालयामध्ये शैक्षणिक वर्षात एकदा ‘माझी शाळा’ हा विशेष अंक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच या उपक्रमामुळे -
अ ) सर्व शाळेतील निवडक विद्यार्थ्यांना वृत्तपत्र कार्यालयातील कार्यानुभव घेण्याची संधी मिळेल.
ब ) विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या ‘सकाळ NIE’ सर्वोत्तम अंक स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळेल.

३) आपल्या विद्यालयातील निवडक उपक्रमांना NIE अंकांतून प्रसिद्धी तसेच संपादकीयदृष्टया योग्य असलेलं विद्यार्थीलेखन, मजकूर व चित्रांना प्रसिद्धी दिली जाईल.

सकाळ NIE अंक घरपोच मिळविण्यासाठी व नाव नोंदणी करण्यासाठी खालील QR स्कॅन करा



सकाळ NIE NEWSPAPER IN EDUCATION

## - वार्षिक वर्गणीदार नोंदणी फॉर्म -

विद्यार्थ्याचे नाव : ______

पालकांचा व्हॉट्सअ‍ॅप मोबाईल क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

पालकांचा ईमेल आयडी : ______

घराचा पत्ता : ______

तालुका : ______ जिल्हा : ______ पिनकोड : ______

वृत्तपत्र विक्रेत्याचे नाव : ______ विक्रीकेंद्राचे नाव: ______

शक्य असल्यास वृत्तपत्र विक्रेत्याचा संपर्क क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

इयत्ता : ४थी ☐ ५वी ☐ ६वी ☐ ७वी ☐ ८वी ☐ ९वी ☐ १०वी ☐ तुकडी : ______

माध्यम : मराठी ☐ सेमी इंग्रजी ☐ इंग्रजी ☐

पालकांचा व्यवसाय : नोकरी ☐ शेती ☐ व्यवसाय ☐ इतर : ______

**मी सकाळ NIE या प्रकाशनाची वार्षिक वर्गणी भरु इच्छितो/ इच्छिते.** **पालकांची स्वाक्षरी**


**अंक घरपोच मिळविण्यासाठी वर्गणीदारांनी वरील नोंदणी फॉर्म व वर्गणीची रक्कम रु ३०० रोख स्वरुपात आपल्या वृत्तपत्र एजंट किंवा विक्रेता यांच्याकडे जमा करावी. अधिक माहितीसाठी संपर्क - १८८१५ १८८१५**

**एजंट-विक्रेता माहिती :** आज दि.______ रोजी श्री.______
यांची सकाळ एनआयई प्रकाशनाची वर्गणी रु. ३०० रोख स्वरूपात, आपल्या प्रतिनिधीकडे जमा करीत आहे.
खाते क्र.______ एजंटाचे/विक्रेत्याचे नाव : ______
गावाचे नाव : ______ विक्री केंद्राचे नाव: ______ एजंट-विक्रेता सही


# घरच्या घरी प्रयोगशाळा...!

— अशोक तातुगडे

दोस्तांनो, सध्या पावसाळा सुरू आहे. आजच्या दोन प्रयोगांमध्ये आपण पावसाळ्यात घडणाऱ्या काही घटना घरच्या प्रयोगशाळेत करणार आहोत आणि त्या मागचे विज्ञान समजावून घेणार आहोत.







## घरीच बनवूया ढग

या प्रयोगासाठी अत्यंत कमी साहित्याची जरुरी असते. ते घरात सहजच मिळेल.

**कृती :**

- आपण नेहमी वापरतो ती पाण्याची मोठी (२ लिटर) प्लॅस्टिकची बाटली घ्या.
- तिच्या एकतृतीयांशपर्यंत गरम पाणी घाला. बूच घट्ट लावा. त्या पाण्याची वाफ होऊन बाटलीतील वरच्या बाजूच्या हवेत मिसळेल.
- हा ढग तयार करण्यासाठीचा एक घटक निर्माण होईल. आता बाटली जरा जोराने दाबा. थोडा वेळ दाबून धरून ठेवा आणि सोडून द्या. काय होते ते बघा.
- त्यानंतर बाटलीचे बूच उघडून त्याच्या तोंडाशी एक पेटलेली आगकाडी धरा. थोड्या वेळाने आगकाडी विझताना बाटलीच्या आत टाकून द्या. परत बूच घट्ट लावून घ्या. आत कोंडलेल्या धुराचे कण तयार होतील. हे आहे दुसरे पाऊल. आता ती बाटली परत हाताने दाबा. त्यामुळे आतल्या हवेवर दाब पडून ती गरम होईल. आता तो दाब सोडून दिलात की ती थंड होईल आणि बाटलीत ढग तरंगू लागलेले तुम्हाला दिसतील. बघा बरं व्यवस्थित ढग तयार होतात की नाही ते. आणि दाखवा ते ढग आई-बाबांना.

## इंद्रधनुष्य

इंद्रधनुष्य हा प्रकाशाच्या परावर्तन आणि वक्रीभवन या दोन गुणधर्मामुळे तयार होणारा नैसर्गिक आविष्कार आहे. प्रकाश किरणे एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात शिरताना त्यांची दिशा बदलते, त्यांना आपण वक्रीभवन म्हणतो. त्यांचा वेग दोन माध्यमांतून प्रवास करताना वेगवेगळा असतो. विरळ माध्यमातून घन माध्यमात शिरताना प्रकाशाचा वेग मंद होतो. उलट घन माध्यमातून विरळ माध्यमात गेल्यावर तो वाढतो. पावसाच्या थेंबामधून आपल्या पाठीमागून येणारे सूर्यकिरण ४२ अंशाच्या कोनातून जाताना हवेसारख्या विरळ माध्यमातून पाण्यासारख्या घन माध्यमात प्रवेश करतात तेव्हा परावर्तन होते, त्यांची दिशा बदलते आणि पृथक्करणही होते. अशा वेळी सूर्यप्रकाशाच्या वेगवेगळ्या सूर्यकिरणांचा प्रवास स्वतंत्र होतो आणि आपल्याला त्यातले सात रंग स्वतंत्रपणे दिसतात. आता हे होते कसे हे प्रयोग करून पाहूया.

**कृती :**


- एक थाळी घ्या, ती अर्धी पाण्याने भरा. तिच्यात एक आरसा तिरपा ठेवा. आकृती पाहा.
- आरशाचा काही भाग पाण्यात बुडालेला असेल आणि काही भाग पाण्याच्या बाहेर असेल, असा आरसा ठेवा.
- त्या पाण्यातल्या आरशावर सूर्यकिरणे पडतील अशा ठिकाणी ती थाळी ठेवा. सूर्य किरणे आरशावर कोन करून पडतील अशा वेळी हा प्रयोग करा.
- एक कोरा पांढरा कागद घेऊन तो आरशावर धरा. कागद अशा ठिकाणी धरा की आरशावरून परावर्तित झालेले सूर्यकिरण कागदावर पडतील. कागद वेगवेगळ्या कोनातून हलवून पहा.
- एका क्षणी पाण्यामधून शिरणारे सूर्यकिरण नेमका ४२ अंशांचा कोन करून शिरतील आणि तुमच्या हातातल्या कागदावर पडतील, तेव्हा तुम्हाला इंद्रधनुष्य कागदावर दिसेल. समजले ना इंद्रधनुष्य कसे होते ते. चला तर, शाळेत इतर मित्र-मैत्रिणींनाही करून दाखवा.



## ॲप माझे

वैभव गाटे

# वाढवा इंग्रजीचा शब्दसंग्रह




**इंग्रजी शब्दांचा अर्थ समजून घेण्यासाठी तुम्ही अनेकदा शब्दकोशाचा वापर करत असाल. त्यातून तुम्हाला हव्या असलेल्या शब्दांचा अर्थही मिळत असेल. असेच शब्द समजून घेण्यासाठी तुम्ही 'डिक्शनरी - मेरिअम वेबस्टर' या ॲपचा वापर करू शकता. हे ॲप तुम्हाला केवळ शब्दांचा अर्थच सांगणार नाही, तर गेम, क्विझ, व्हिडिओ यांच्या माध्यमातून तुमच्या ज्ञानात नव्या शब्दांची, माहितीची भर घालेल.**

### 'डिक्शनरी - मेरिअम वेबस्टर'बद्दल

अमेरिकेत या डिक्शनरीला प्रचंड पसंती मिळते. हीच डिक्शनरी नंतर ॲपच्या स्वरूपात आणली गेली. त्यामुळे ती जगभरातील लोकांच्या पसंतीस उतरली. या डिक्शनरीद्वारे तुम्ही हसतखेळत नवीन शब्द शिकू शकता, आपला शब्दसंग्रह किती आहे हे तपासू शकता आणि क्विझ, पझल खेळून नवे शब्दही शिकू शकता. याशिवाय शब्दांची जन्मकथाही तुम्हाला उपलब्ध होईल. आहे की नाही मजेशीर ॲप? नुकतीच या डिक्शनरीत नव्या शब्दांची भर पडली आहे.

### डिक्शनरी खासियत

- शब्द आणि शब्दांचा अर्थ शोधणे सोपे.
- गेम, क्विझद्वारे नवे शब्द जाणून घेता येतात.
- फक्त शब्दच नाही, तर सामान्यज्ञानही मिळते.
- व्हॉइस सर्चची सुविधा उपलब्ध.
- 'वर्ड ऑफ द डे'मधून रोज नवा शब्द आणि त्याची माहिती.
- योग्य शब्द योग्य ठिकाणी कसा वापरायचा याची माहिती.
- शब्दोच्चार शिकण्याची संधी (मानवी आवाजात).
- कोणत्या वर्षी कोणत्या शब्दाची उत्पत्ती झाली याची माहिती.
- उत्पत्ती झालेल्या शब्दांचा इतिहास.
- व्हिडिओद्वारे वाक्यरचना कशी करायची हे शिकण्याची संधी.



**कोठे उपलब्ध?**
प्ले स्टोअर, ॲपल ॲप स्टोअर

**कुठे वापरता येणार?**
मोबाईल, टॅब्लेट, संगणक

**कोण वापरू शकते?**
इयत्ता चौथीच्या पुढील विद्यार्थी

**किंमत?**
सर्वांसाठी मोफत

# जोपासा चित्रकलेचा छंद

**आपला छंद जोपासायला कोणाला नाही आवडत? तुमचाही काही तरी छंद नक्कीच असेल.** काहींना चित्रकलेचा छंद असतो. अनेकदा आपण टीव्हीवरील कार्टून, सुपरहीरो यांचे चित्र काढतो, तर अनेकदा निसर्गचित्र. कदाचित तुम्हाला अनेकदा चित्रकलेचा क्लास लावायची इच्छाही झाली असेल. पण, हीच चित्रकला तुम्हाला घरच्या घरी शिकता आली तर? यासाठी तुम्हाला मदत करेल 'आर्ट फॉर किड्स हब'.

### 'आर्ट फॉर किड्स हब'बद्दल

हे संकेतस्थळ असून, त्यामध्ये व्हिडिओच्या माध्यमातून चित्र कसे काढावे, रंग कसे भरावे याच्या सोप्या पद्धती शिकवल्या जातात. शिवाय यासाठी कोणते साहित्य वापरावे येथपर्यंत संपूर्ण माहिती तुम्हाला दिली जाते. यावर तुम्ही प्राणी, पदार्थ, वृक्ष यांची चित्रे कशी काढायची हे शिकू शकता. एवढेच काय, ओरिगामीचे शिक्षणही घेऊ शकता!






### काय आहेत वैशिष्ट्ये?

- वापरायला अत्यंत सोपे संकेतस्थळ.
- लेटेक्स कार्टून कसे काढायचे, कसे रंगवायचे याची माहिती.
- कोणते साहित्य वापरायचे याची माहिती.
- सणानिमित्त कोणती चित्र कशी काढावीत, याचे प्रात्यक्षिक.
- व्हिडिओच्या माध्यमातून प्रशिक्षण.
- विविध चित्रांचा मोठा व्हिडिओ संग्रह.
- ओरिगामी प्रशिक्षणाचा मोठा व्हिडिओ संग्रह.
- वेगवेगळ्या ऋतूंमध्ये कोणते चित्र काढता येईल याची माहिती.

**कोठे उपलब्ध?**
- https://artforkidshub.com/

**कोठे वापराल?**
- संगणक, मोबाईल

**कोण वापरू शकते?**
- इयत्ता चौथीच्या पुढील विद्यार्थी

**किंमत?**
- सर्वांसाठी मोफत

चित्रकला शिकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

> "The man well prepared for the struggle has achieved half a triumph. — Miguel de Cervantes

# मला बँकेत खाते काढता येईल का?

**अर्थमंत्र**

मित्र-मैत्रिणींनो, आपण बचत कशी करावी, मोबाईल आणि बँकेचा संबंध काय, मोबाईल बँकिंगद्वारे भाजीवाल्या काकांना पैसे कसे मिळतात, अशा विविध गोष्टींची माहिती घेत आहोत. आता बचत करण्यासाठी, मोबाईल बँकिंगसाठी काय हवे? तर बँक खाते. तुमच्या आई-बाबांचे बँकेत खाते असते, तसेच तुम्हीही तुमचे खाते बँकेत सुरू करू शकता. चला, हे खाते कसे उघडायचे हे आपण बघूया.

दोस्तांनो, लहान मुलांसाठीच्या बँक खात्याला म्हणतात 'मायनर अकाउंट.' बँकिंगच्या भाषेत १८ पेक्षा कमी वय असलेल्या मुला-मुलींना अल्पवयीन, म्हणजेच 'मायनर' म्हटले जाते. याच मुलांच्या बँक खात्याला 'मायनर अकाउंट' किंवा 'मायनर खाते' असे म्हणतात.



## कसे सुरू कराल खाते?

**अठरा वर्षांपेक्षा कमी वय असलेली मुले-मुली बँकेत मायनर अकाउंट सुरू करून बचत करू शकतात.** आता हे खाते सुरू करण्यासाठी तुम्हाला बँकेत जावे लागेल. तिथे तुम्हाला एक मायनर अकाउंटसाठीचा फॉर्म भरावा लागेल, काही कागदपत्रे जोडावी लागतील अन् तुमचे मायनर बँक खाते सुरू.

## घ्या पालकांची मदत...

**मित्र-मैत्रिणींनो, हे बँक खाते कसे वापरायचे हे तुम्हाला समजून घ्यावे लागेल.** त्यासाठी तुम्हाला मदत घ्यावी लागेल तुमच्या पालकांची. तुम्ही दहा वर्षांपेक्षा लहान असाल, तर तुम्हाला तुमचे बँक खाते तुमच्या पालकांच्या साह्यानेच वापरावे लागेल. म्हणजे काय, तर बँकेतून पैसे काढण्यासाठी, पैसे जमा करण्यासाठी तुम्हाला तुमच्या पालकांना सोबत न्यावे लागेल. यामुळे काय होईल, तर तुम्हाला बँकेत गेल्यावर पैसे काढताना, जमा करताना कोणती स्लिप भरायची, कोणत्या काउंटरवर ती जमा करायची अशी माहिती सहज मिळेल अन् पैशांचे व्यवहार करताना कोणतीही चूकही होणार नाही. जर तुमचे वय दहा वर्षांपेक्षा अधिक असेल, तर तुम्ही तुमचे बँक खाते स्वतःच हाताळू शकतात. आहे की नाही सोपे.

## मायनर खात्याचे फायदे

**आमची बँक आम्हाला बचत खात्यावर इतके व्याज देते,** या ठेवीवर इतके व्याज मिळते, असे तुम्ही तुमच्या पालकांकडून अनेकदा ऐकले असेल. आपण बचत खात्यात ठेवत असलेल्या रकमेवर आपल्याला हे व्याज मिळत असते. असेच व्याज तुम्हालाही तुमच्या मायनर अकाउंटमध्ये ठेवलेल्या रकमेवर मिळेल. आता हे व्याज किती मिळेल? तर ते तुमच्या रकमेवर अवलंबून आहे. शिवाय तुम्ही तुमच्या खात्यातील अतिरिक्त रक्कम मुदत ठेवीमध्येही (एफडी) ठेवू शकतात.

## सज्ञान झाल्यावर सामान्य खाते

**दोस्तानो, बँकेत सुरू केलेले मायनर बचत खाते तुम्ही १८ वर्षांचे पूर्ण झाल्यावर, म्हणजे सज्ञान झाल्यावर सामान्य बचत खात्यात रूपांतरित होते.** त्यासाठी तुम्हाला बँकेमध्ये केवायसी माहितीसह पुन्हा एकदा अर्ज करावा लागेल. तुमचे आधारकार्ड, पॅनकार्ड, ओळखपत्र व अन्य काही कागदपत्रे तुम्हाला त्यासाठी जोडावी लागतील. त्यानंतर तुम्ही सामान्य बचत खात्यासाठी आवश्यक असलेले लाभ मिळवू शकाल.



## घरबसल्याही सुरू करता येते खाते


**तुम्ही स्टेट बँक ऑफ इंडियाबद्दल (एसबीआय) ऐकलंच असेल. तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल की एसबीआय ही देशातील सर्वांत मोठी बँक आहे.** या बँकेच्या देशात सर्वाधिक शाखा (२२ हजार ४०५) आहेत. तुम्हीही 'एसबीआय'च्या शाखा तुमच्या परिसरात नक्की पाहिल्या असतील. हीच बँक तुम्हाला घरबसल्या मायनर खाते सुरू करण्यास मदत करू शकते. आता त्यासाठी काय करालं. तर sbi.co.in या संकेतस्थळावर जा. तेथे मायनर अकाउंट हा पर्याय निवडा. तेथे ओपन अकाउंटवर क्लिक करून आवश्यक माहिती भरा. त्यानंतर एसबीआयचा एखादा कर्मचारी तुमच्या घरच्या पत्त्यावर येऊन तुमच्याबद्दल संपूर्ण खात्री करून घेईल आणि तुमचे मायनर खाते सुरू होईल. इतकं सोपं आहे बघा. पण, हे सर्व करताना तुमच्या पालकांची मदत घ्यायला विसरू नका. विशेष काय माहितीये? या खात्यासाठी किमान रकमेची (मिनिमम बॅलन्स) कोणतीही अट नाही, त्यामुळे तुम्ही खात्यात कमीत कमी कितीही रक्कम जमा ठेवू शकतात. आयडीएफसी, कोटक, इंड्सइंड यांसारख्या बँका अशी खाती उघडण्यासाठी मदत करतात. त्यांची माहिती घ्या. काही बँकांमध्ये तुमच्यासाठी विशेष काही सुविधाही मिळू शकते. या सगळ्याची माहिती नक्की घ्या आणि मगच खाते उघडण्याची आई-बाबांना विनंती करा.

---

**स्मार्ट माहिती**

# 'चेक' म्हणजे नक्की असतं तरी काय?

दोस्तांनो, तुम्ही आई-बाबांबरोबर बँकेत कधी तरी जात असाल ना? तेव्हा त्यांच्या तोंडून 'चेक' हा शब्द बऱ्याच वेळा ऐकला असेल ना? ते बँकेत जातात तेव्हा एक विशिष्ट प्रकारचं पुस्तक काढून त्यातील एक पान फाडतात, त्यामध्ये काहीतरी लिहितात आणि बँकेतल्या माणसाजवळ तो कागद देतात, असं तुम्ही पाहिलं असेलच. हा 'चेक' म्हणजे नक्की असतो काय, त्या पुस्तकाला नेमकं काय म्हणतात? तर, चला मग त्याविषयी जाणून घेऊया!




## चेक सुरक्षित ठेवा

मित्र-मैत्रिणींनो, तुमच्या घरात कुठे चेक पडलेला दिसला, तर तो व्यवस्थित ठेवा. चेक किती महत्त्वाचा असतो हे तर तुम्हाला आता कळलंच, त्यामुळे लगेचच तो आई-बाबांना दाखवा. चेकवर डाग पडलेले चालत नाहीत, त्यामुळे तो व्यवस्थित ठेवा. चेकबुक कुठं सापडलं, तर ते लगेच त्यांच्याकडे द्या. तुमच्या शाळेच्या फीचे पैसे आई-बाबा चेकनं देत असतील, तर त्यावर लिहिलेली रक्कम बरोबर आहे का ते नक्की तपासून बघा, किंवा त्यांना त्यात काय मदत पाहिजे का ते विचारा.

## चेकचे काही प्रकार

**बेअरर चेक -** खातेदाराऐवजी दुसऱ्या व्यक्तीला बँकेतून पैसे काढण्यासाठी पाठवायचं असेल, तेव्हा बेअरर चेक दिला जातो. यात त्या व्यक्तीचं नाव चेकवर लिहिलेलं असतं. ती चेक बँकेत सादर करेल, तेव्हा त्यावर लिहिलेली रक्कम तिला मिळेल. अर्थात खातेदाराची सही लागतेच. असा चेक देणं जोखमीचं असतं, त्यामुळे त्याचा वापर कमी केला जातो.

**क्रॉस चेक -** या चेकच्या डाव्या बाजूस कोपऱ्यात दोन वेळा क्रॉस केलं जातं म्हणजे तिरक्या रेषा काढल्या जातात, तसंच जिथे बेअरर असं लिहिलेलं असतं त्यावर काट मारलेली असते. या क्रॉस चेकमुळे ज्याला पैसे मिळणार आहेत, त्यानं तो बँकेत सादर केल्यावर त्याच्या हातात रक्कम मिळत नाही, ती रक्कम त्या व्यक्तीच्या खात्यात जमा होते.

**पोस्ट डेटेड चेक -** तुम्ही एखाद्या व्यक्तीला चेक दिला आहे; पण तुमच्या बँकेच्या खात्यातून लगेच पैसे वळते होऊ नयेत असं वाटत असेल, तर अशा वेळी पोस्ट डेटेड चेक दिला जातो. म्हणजे थोडक्यात त्यावर पुढची तारीख लिहिली जाते. त्या तारखेआधी तुमच्या खात्यातून रक्कम वळती होत नाही.

## चेक म्हणजे नेमकं काय?

**चेक म्हणजे धनादेश.** धनादेश हा असा कागद आहे ज्यामार्फत कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला पैसे देण्यासाठी तुम्ही बँकेला केलेली विनंती असते. चेकचा वापर हा व्यक्तीला किंवा संस्थेला पेमेंट करण्यासाठी केला जातो. ज्या व्यक्तीच्या नावानं चेक दिलेला असतो, त्या व्यक्तीच्या खात्यात चेक देणाऱ्या व्यक्तीच्या खात्यातून पैसे जमा होतात. या प्रक्रियेला पूर्वी खूप वेळ लागायचा. मात्र, गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे एक दिवसात रक्कम जमा होऊ शकते. दोघाही व्यक्तींचं खातं त्याच बँकेत असेल, तर त्या दिवशीसुद्धा रक्कम जमा होऊ शकते.

## चेकवर नेमका काय मजकूर असतो बरं!

**चेकवर सर्वांत आधी प्राप्तकर्त्याचं, म्हणजेच ज्याला आपल्याला रक्कम पाठवायची आहे त्याचं नाव लिहिण्यासाठी जागा असते.** उजव्या बाजूला कोपऱ्यात तारीख लिहिण्यासाठी जागा दिलेली असते. नावाच्या खालील बाजूस आपल्याला किती रक्कम द्यायची आहे हे शब्दात लिहिण्यासाठी जागा असते. ही रक्कम अक्षरांमध्ये लिहावी लागते. त्याच्याच उजव्या बाजूला रक्कम अंकात लिहिण्यासाठी एक छोटा कॉलम असतो. सगळ्यात खाली उजव्या बाजूला जो व्यक्ती पैसे देणार आहे याची स्वाक्षरी असते. इतरही अनेक गोष्टी असतात; पण तूर्त आपण त्या सोडून देऊ. चेकमध्ये सगळ्यांत खाली वेगवेगळे क्रमांक असतात. त्यातला सर्वांत डावीकडचा क्रमांक म्हणजे चेक नंबर हे लक्षात ठेवा. समजा तुमची आई किंवा बाबा बाहेर आहेत, त्यांना काही तरी कामासाठी चेकचा नंबर पाहिजे आहे आणि त्यांनी तुम्हाला तो विचारला तर तुम्ही हाच नंबर सांगा बरं का.

## चेकचं पुस्तक म्हणजे 'चेकबुक'

**चेक असतात त्या पुस्तकाला 'चेकबुक' असं म्हणतात** आणि त्यामधील एकेक स्वतंत्र कागदाला 'चेक' म्हणतात. हा चेक बँकिंग क्षेत्रात खूप महत्त्वाचा असतो बरं का. आज अगदी मोबाईलवरूनसुद्धा पैशांचं ऑनलाइन पेमेंट, यूपीआयच्या आधी चेकचा काळ होता. चेकद्वारे केलेला व्यवहार सुरक्षित मानला जातो, त्यामुळे व्यावसायिक किंवा कंपनीच्या आर्थिक व्यवहारांसाठी चेकचा वापर केला जातो.





" Productivity is never an accident. It is always the result of a commitment to excellence, intelligent planning, and focused effort. — Paul J. Meyer

## खालील चित्रांतील अधिकाधिक फरक शोधा.



## दरवाजा उघडण्यासाठीची योग्य चावी शोधा



## प्राणी-पक्षी ओळखून शब्दकोडे सोडवा





## डावीकडे फळांच्या डिशचा टॉप व्ह्यू दिला आहे, ती डिश कोणती, ते ओळखा.




## योग्य तुकडे जोडून इमारती पूर्ण करा




## खालील चित्रातील गणितीय क्रिया करून चित्र रंगवा



खेळ खेळूयात

# शिवणापाणी आणि आंधळी कोशिंबीर

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख



**शिवणापाणी हा कुठेही खेळता येणारा पळापळीचा खेळ आहे.**

**असे खेळावे :**

- हा खेळ खूप वेगवेगळ्या पद्धतीने खेळून त्यात नावीन्य आणता येते.
- या खेळासाठी दोनपेक्षा जास्त कितीही खेळाडू असतील, तर खेळायला खूप मजा येते.
- खेळाचे मैदान एखादा गोल, चौकोन किंवा ठरावीक मर्यादित जागा असे असते.
- यामध्ये एक पळून राज्य घेणारा खेळाडू आणि बाकीचे बचाव करणारे खेळाडू असतात.
- सर्व खेळाडू बाद होईपर्यंत एक डाव चालतो. जो खेळाडू पहिल्या वेळी बाद होईल त्याने किंवा जो मैदानाबाहेर जाईल त्याने पुढील डावात राज्य घ्यायचे असते.

**हा खेळाच्या वेगवेगळ्या पद्धती आपण पाहूया.**

**१. मुंडीमार :** यामध्ये राज्य असलेल्या खेळाडूने हात मागे बांधून डोक्याने खेळाडूला बाद करायचे असते.

**२. पायमारी :** यामध्ये राज्य घेणाऱ्याने दोन हात आणि दोन पायांवर पळत एका पायाने खेळाडूला बाद करायचे असते. छोट्या जागेत हा खेळ खेळला जातो.

**३. आंधळी कोशिंबीर :** या खेळात राज्य घेणाऱ्या खेळाडूचे डोळे बांधून त्याने आवाजाच्या दिशेने कानोसा घेत खेळाडूंना हाताने बाद करायचे असते.

**फायदे आणि कौशल्ये :**

- वेगात सलग पळता येणे हे उत्तम दमश्वासाचे लक्षण आहे.
- यामुळे हृदयाची क्षमता वाढते. पायांच्या पाठीच्या स्नायूंची ताकद वाढते.
- चकवा चकवी यामुळे तोल, चपळता वाढीस लागते.
- मेंदू ज्ञानेंद्रिये आणि शरीराचा समन्वय सुधारतो. संयम, चिकाटी अशी मानसिक कौशल्ये या सोप्या खेळाने वाढीस लागतात. हा खेळ सर्व खेळासाठी विशेषतः कबड्डी, खो-खो या सांघिक खेळांसाठी पूरक ठरतात.

शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी

Miss. Smita Bhaskar Kshirsagar

# Subject – English, Unit 2 - Vocabulary

## Weightage-24%, Expected numbers of questions 6

"Vocabulary is not just about knowing the words; it's about knowing how to use them to express yourself effectively" - Unknown



**विद्यार्थी मित्रांनो, शिष्यवृत्ती परीक्षेच्या दृष्टीने इंग्रजी शब्दसंपत्ती, शब्दसंग्रह हा एक महत्त्वाचा घटक आहे. एकूण सर्व घटकामधील Vocabulary हा सर्वाधिक भारांश असणारा घटक आहे. या घटकावर एकूण 6 प्रश्न विचारले जातात. या घटकाचे गुणप्राप्त करण्यासाठी खालील काही गोष्टी आपल्याला नियमितपणे करणे आवश्यक आहे.**

1) Read your English Textbook from 1st class to 5th class.
2) Read and write all the important words from all lessons and poems.
3) Read and write at least 10 words daily.
4) Use a dictionary whenever needed.
5) Read the English Newspaper to increase your word power.
6) Read one story in a week.
7) Learn action words and describing words with the help of pictures.

Vocabulary या मुख्य घटकाची विभागणी 12 उपघटकांमध्ये केलेली आहे. आपण यातील 7 उपघटकावरील प्रश्नांचा अभ्यास करून हा घटक समजून घेऊया.


**2.1 Writing familiar/related words with the given clues/pictures.**

**1) Choose the correct alternative.**

1) Carpenter — colour, stitch
2) Tailor — measure, bend
3) Potter — repair, teach
4) Doctor — operation, stethoscope

**Explanation :** Option 4 is correct because all the words in option 4 belong to the occupation of doctor. Therefore, option 4 is correct answer.

**2) Select the correct option related to the given picture.**



(1) Bear
(2) Fox
(3) Dog
(4) Goat

**Explanation :** In the given box, there is a picture of a fox. So the answer is option 2.

**2.2 Correlating words with pictures.**

1) Choose the correct picture for which the given action words are applicable.

**Action words :** pour, sip, fill



(1) (2) (3) (4)

**Explanation :** Pour, sip and fill are related to the bottle. So the correct answer is option 1.

**2) The boy has ..................................in the given picture.**



(1) fever
(2) headache
(3) stomachache
(4) cough and cold

**Explanation :** Observe the picture carefully. The boy puts his hand on stomach because of stomachache. So answer is option 3.

**2.3 Rhyming words**

**1. Choose the rhyming words to the given group of words.**

| | |
|---|---|
| sick | pick |
| tick | click |

(1) clock (2) black (3) sack (4) brick

**Explanation :** Here 'brick' is the correct rhyming word with the given group. So the option "4" is correct answer.

**2. Read carefully and select the correct alternative of rhyming words.**

light — spoon — floor — train

(1) lamp, book, flower, tree
(2) night, moon, door, rain
(3) lion, cook, poor, fountain
(4) lake, snake, score, brain

**Explanation :** The words rhyming with the given words are light-night, spoon-moon, floor-door, train-rain serially. Therefore, option 2 is correct answer.

**2.4 Writing opposite words :**

**Find the opposite word of the given word.**

**1. win × ....................**

(1) victory (2) play (3) game (4) lose

**Explanation :** The opposite word of win is lose Therefore, option 4 is the correct answer.

**2. long × ..................**

(1) tall (2) short (3) strong (4) wide

**Explanation :** The opposite word of win is lose. Therefore, option 2 is correct answer.

**3. Choose the correct alternative.**

(1) honest × dishonest (2) shiny × tiny
(3) thin × weak (4) friend × buddy

**Explanation:** The opposite word pair honest × dishonest is correct. Therefore, option 1 is correct answer.

**2.5 Writing word register:**

**1. Select the proper word related to the given word register.**

**mechanic :** repairs, tools, service, inspection, transmission, .......

(1) preparation (2) grill
(3) maintenance (4) sewing

**Explanation :** maintenance is the proper word which is related to the given register. So option 3 is the correct answer.

**2. Complete the word register.**

drum, cymbals, flute, guitar, ...........

(1) sieve (2) stain (3) tambourine (4) grater

**Explanation:** All the above are musical instruments. So option 3 'tambourine' is correct answer.

**2.6 Finding small words from the bigger ones.**

**1. Write the missing letter.**

hu_ / ge_ / ma_ → ?

(1) g (2) s (3) r (4) t

**Explanation :** With the letter 't' we can make meaningful words that are hut, get, mat. So option 4 't' is correct answer.


**2. From the word 'bus-stand' which word will be opposite for the underlined word?**

(1) road (2) sit (3) vehicle (4) parking

**Explanation :** stand x sit. Therefore, option 2 is correct answer.


### Questions for practice

**1) Select the correct word related to the given picture.**



1) cry
2) talk
3) think
4) sing

**2) Identify the incorrect action word related to the given picture.**



1) close
2) cut
3) slice
4) eat

**3) Fill in the blank- beat, heat, .............., seat.**

1) great 2) wet 3) treat 4) near

**4) Select the opposite word for 'foolish'**

1) wise 2) boy 3) slow 4) dull

**5) Choose the correct related word to the clothes**

1) shoes 2) bracelet 3) garment 4) watch

**6) How many two letter words can be formed by using the letters of the word 'Father'?**

1) 4 2) 3 3) 2 4) 1

**7) Choose the correct alternative related to 'circus'.**

1) carpenter 2) driver 3) chef 4) clown

# Subject - English

## Unit - Word Puzzles and Riddles

## Weightage - 8%, Expected Number of questions - 2

शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी

Mr. Kishor Borse

**To solve puzzles or to give answers of the riddles, it is the kind of game, fun. Students enjoy tosolve this question.**

विद्यार्थी मित्रानो, शिष्यवृत्ती परीक्षेत इंग्रजी विषयात Word Puzzles and Riddles या घटकावर प्रश्न येतात. या प्रश्नाच्या माध्यमातून सामान्यज्ञान, इंग्रजी शब्दांचे ज्ञान, कल्पकवृत्ती एखादा प्रश्न सोडवण्यासाठी नवीन पद्धतीने विचार करण्याची क्षमता इत्यादी घटक तपासले जातात. या घटकाचे गुण प्राप्त करण्यासाठी काही गोष्टी आपल्याला नियमित करणे अपेक्षित आहे.

1) Make Your Friendship with the English Dictionary. English Dictionary is one of the most important parts of this topic.
2) Read and write everyday atleast 1 new word, phrase and proverb.
3) Read the English Newspaper to increase your word power.
4) Read the riddles and solve the puzzles.
5) Solve the previous years' questions of this topic.
6) Read the questions and options carefully while you solve the questions.

Word Puzzles या घटकावर प्रश्न विचारताना योग्य संदर्भ असलेल्या स्पेल्लिंगची निवड करावी लागते. प्रश्नांची रचना वेगळ्या फॉर्मॅटमध्ये असते. Word Puzzles या घटकावर आधारित प्रश्नांचा अभ्यास करत आपण घटक समजून घेऊया.

**1) Choose the correct alternative which is used to make food tasty and delicious**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| O | P | E | S | S | P |
| F | I | A | A | L | E |
| A | R | L | L | M | P |
| N | Y | H | T | N | P |
| Z | G | S | S | O | E |
| G | I | N | G | E | R |

(1) GARLIC (2) CHILLY
(3) MINT (4) GINGER

**Key points** - You should know the meaning of all spelling of options. Read the question carefully.

**Answer** - 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●

**2. Complete the crossword puzzle related to study material**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| E | | | | | | | |
| R | | S | | | | | |
| A | | C | | | | | |
| | H | | R | | N | E | R |
| E | | L | | E | | | |
| R | | E | | N | | | |

(1) A, L, S (2) S, P, B (3) A, P, N (4) S, A,P

**Key points** - Study material is basic hint to solve this Question. You should think and make words carefully.

**Answer** - 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●

**3. Find out two milk products from the grid. Choose one alternative.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| A | P | I | F | G | D |
| C | E | F | H | H | I |
| B | U | T | T | E | R |
| A | C | C | I | E | C |
| B | I | D | D | E | F |

(1) LASSI, BUTTER
(2) BUTTER, GHEE
(3) CURD, PANEER
(4) MILK, GHEE

**Key points** - These words are related to our daily life. Your observation skill is important here.

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**4. Choose the correct alternative to complete crossword puzzle. It is related to grains.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| B | | J | R | A | | |
| | | O | | | | |
| | | W | H | E | | T |
| | | | | | | |
| | | R | | | | |

(1) E
(2) A
(3) I
(4) O

**Key points** - These words are related to our daily life. So Reading of all kind of words is important here.

**Answer** -1) ○ 2) ● 3) ○ 4) ○

5. Choose one correct alternative. Find out the object and its colour from the grid.

| | | |
|---|---|---|
| B | A | C |
| P | P | M |
| E | P | A |
| A | L | L |
| R | E | D |

(1) APPLE - RED
(2) MANGO - YELLOW
(3) PEAR-GREEN
(4) CHILLI-GREEN

**Answer** -1) ● 2) ○ 3) ○ 4) ○

Riddles या घटकामध्ये काही प्रश्न सामान्यज्ञान तसेच वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित असतात. प्रश्नाचे काळजीपूर्वक वाचन करणे आवश्यक असते. Riddles या घटकावर आधारित प्रश्नाचा अभ्यास करत आपण घटक समजून घेऊया.

**1) Read the riddle and choose the correct alternative:**

I have three blades.
It rotates in clockwise direction.
It gives cool air and breeze when you switch on, it makes you pleasant in summer.

(1) window (2) fan (3) helicopter (4) grinder

**Answer** -1) ○ 2) ● 3) ○ 4) ○

**Key Points** - Your general knowledge is also important here. You should know the meaning ofnew words like direction, breeze.

**2) Read the following riddle and choose one correct option.**

I'm tall when I'm young.
I'm short when I'm old.
What am I?

(1) Tree (2) Candle (3) Egg (4) Stick

**Answer** - 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○

**Key Points** -This question is easy to understand but you should think here properly.

**3) Read the following riddle and choose one correct option.**

I use a stethoscope.
I examine patients.
Who am I?

(1) a mechanic (2) a potter
(3) a cobbler (4) a doctor

**Answer** - 1) ○ 2) ○ 3) ○ 4) ●

**Key points** - To solve riddle question, our vocabulary should be good.

**4) Read the riddle given below and choose the correct option.**

You open your mouth to do it.
It shows you are sleepy.
What is it?

(1) Cough (2) Yawn (3) Sneeze (4) Dream

**Answer** - 1) ○ 2) ● 3) ○ 4) ○

### Questions for Practice Test

Read the question carefully (2 times) For practice Test youcan use a Dictionary. Best Luck!!

**1) Choose two correct alternative to complete set of words related to oil.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| C | M | O | L | I | V | E |
| O | S | U | J | G | Q | R |
| C | E | N | S | Z | D | I |
| O | S | N | O | T | J | C |
| N | A | G | T | B | A | E |
| U | M | P | P | C | V | R |
| T | E | P | L | K | N | P |

(1) RICEBRAN (2) ALMOND
(3) SESAME (4) OLIVE

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**2. Choose the correct alternative.**

Hrishikesh was awarded as a 'best student of the year'. Find out three adjectives which suitshim.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| h | i | g | s | m | n | o |
| r | h | o | n | e | s | t |
| a | g | o | t | I | p | q |
| v | c | d | b | o | d | h |
| e | s | m | p | d | b | q |

(1) Good, honest, brave (2) Big,quite, bad
(3) Calm, nest, ago (4) Big, tall, ball

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**3. Choose the correct alternative from the following to complete crossword puzzle.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | F | | | |
| | | L | | | |
| S | H | ? | W | E | R |
| | | W | | | |
| | F | ? | A | R | |
| | | R | | | |

(1) O, E (2) U, A (3) I, G (4) P, B

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**1) Read the riddle given below and choose the correct option.**

1) I live in grass.
2) I am the tallest of all animals.

1) giraffe 2) camel 3) elephant 4) zebra

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**2) You see me once in June,**
twice in November,
and not at all in May

(1) a (2) m (3) e 4) n

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**3) Read the riddle given below and choose the correct two options.**

I have four legs.
But I am unable to walk.

(1) Ox (2) table (3) tortoise (4) chair.

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

**4) I am very hardworking insect.**


I collect nectar from flowers and produce sweet honey from it.
The place where I live is called hive. Who I am?

1) Wasp 2) be 3) Mosquito 4) bee

**Answer** -1) ○ 2) ○ 3) ○ 4) ○

• Registered • Date of Publication : शुक्रवार, ८ सप्टेंबर २०२३ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०२१-२०२३.






# झेप सूर्याकडे...




**‘चांद्रयान ३’च्या यशस्वी मोहिमेनंतर ‘इस्रो’चे आदित्य एल-१ यान सूर्याकडे झेपावले. श्रीहरिकोटा येथून शनिवारी (ता. २ सप्टेंबर) सकाळी ११.५० मिनिटांनी ‘आदित्य एल - १’चे प्रक्षेपण झाले. मित्र-मैत्रिणींनो, भारतासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाकांक्षी आहे बरे का. हे यान आता वेगवेगळ्या कक्षांतून प्रवास करून सूर्य आणि पृथ्वीच्या मध्ये असलेल्या ‘एल - १’ या बिंदूपर्यंत पोहोचेल. हा प्रवास आहे १५ लाख किलोमीटरचा. काय आहे ही आदित्य एल-१ मोहीम? याबद्दल अधिक जाणून घेऊयात...**

## मोहिमेबद्दल

- श्रीहरिकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटर येथून पीएसएलव्ही सी-५७ रॉकेटद्वारे प्रक्षेपण.
- पूर्णतः भारतीय बनावटीचे यान.
- यानाचे वजन १४८०.७ किलोग्रॅम.
- सूर्याचे तापमान, सौरवादळे, अतिनील किरणे याचा अभ्यास या सौरमोहिमेत होणार.
- आतापर्यंत नासा आणि युरोपियन स्पेस एजन्सीने सौरमोहीम राबवली.



## नावात काय आहे?

‘आदित्य एल-१’ या नावामागे रंजक माहिती दडलेली आहे. आदित्य या शब्दाचा अर्थ तर तुम्हाला ठाऊक असेलच. सूर्याला आदित्य या नावानेही ओळखले जाते.

आता **‘एल-१’ (लॅग्रॅन्जियन पॉइंट) म्हणजे नक्की काय?** तर ‘एल-१’ हा सूर्य आणि पृथ्वीच्या मधील एक बिंदू आहे. या बिंदूवर एखादी लहान वस्तू स्थिर राहू शकते. या वस्तूवर विरुद्ध बाजूंकडून समान गुरुत्वीय बल काम करत असते. हा बिंदू पृथ्वीपासून तब्बल १५ लाख किलोमीटर दूर आहे. म्हणजेच, यानाला इतका मोठा पल्ला पार करावा लागणार आहे.

## छायाचित्र पृथ्वीवर पाठवणार

‘आदित्य एल-१’ या सौरमोहिमेत सूर्याच्या अभ्यासासाठी सात वैज्ञानिक उपकरणांचा समावेश केलेला आहे. त्यातील एक उपकरण असेल **व्हिजिबल इमिशन लाइन कोरोनाग्राफ (व्हीइएलसी).** हे उपकरण सूर्याच्या प्रभामंडळ आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या तापमान आणि वस्तूमान याचा अभ्यास करेल. तसेच पृथ्वीवर छायाचित्र पाठवेल. या छायाचित्रांचे विश्लेषण केले जाईल. याशिवाय यात **सोलर अल्ट्रा-व्हायलेट इमेजिंग टेलिस्कोप (सूट)** हे उपकरणही समाविष्ट केलेले आहे. ही एक दुर्बीण असून त्याद्वारे सूर्याची अतिनील किरणे, ओझोनचा थर, सौरवादळे याचा अभ्यास केला जाईल.

## अन्य वैज्ञानिक उपकरणे

- हाय-एनर्जी एल-१ ऑर्बिटिंग एक्स-रे स्पेक्ट्रोमीटर (एचईएल१ओएस) आणि लो- एनर्जी एक्स- रे स्पेक्ट्रोमीटर (एसओएलईएक्सएस) - सौरलहरींतून बाहेर पडणाऱ्या क्ष-किरणांचा अभ्यास करणार
- आदित्य सोलर विंड पार्टिकल एक्सप्रेरिमेंट (एएसपीईएक्स) - वातावरणातील अल्फा आणि प्रोटॉन्सचे निरीक्षण करणार
- प्लास्मा ॲनलायजर पॅकेज फॉर आदित्य (पापा) - सूर्याच्या गरम हवेतील अणुकणांचा अभ्यास करणार

SEPTEMBER 2023

SUN 10 | MON 11 | TUE 12 | WED 13 | THU 14 | FRI 15 | SAT 16